# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.१५/०९/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' कार्यक्षेत्रातील सहकार नगर, विरार पूर्व येथे आज दि.१५ सप्टेंबर, २०२२ रोजी उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांचे निर्देशानुसार एका तळमजला + ३ मजली इमारतीवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' येथे सहकार नगर, विरार पूर्व या ठिकाणी एका तळमजला + ३ मजली अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु असल्याची माहिती मिळाल्यावर महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सदर ठिकाणी भेट दिली. या संदर्भात मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांच्याशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शनाखाली व दिलेल्या निर्देशानुसार उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी प्रभाग समिती 'सी' चे प्र.सहा.आयुक्त श्री.गणेश पाटील यांना तात्काळ तोडक कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्र.सहा.आयुक्त श्री.गणेश पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने व पोकलेनच्या सहाय्याने सदर ७५०० चौ.फुट क्षेत्रफळ बांधकाम केलेल्या तसेच १८ सदनिका व ६ दुकाने असलेल्या इमारतीवर पूर्णतः निष्कासनाची कारवाई केली. यावेळी अतिक्रमण विभाग उप-आयुक्त श्री.अजित मुठे, अभियंता साहिल सावे, लिपिक विजय गोतमारे, पोलीस विभागातील कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान व अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

मा.आयुक्त व मा.अतिरिक्त आयुक्त यांचे निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आली असल्याचे उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांनी सांगितले.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**